दाखल दिनांकः ०१.०१.२०१८
नोंदणी दिनांकः ०१.०१.२०१८
निकाल दिनांकः २६.०६.२०१८
कालावधीः व:०० म:०५ दि:२५

---

# दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, दौंड, जि. पुणे

(पिठासीन अधिकारी श्रीयुत एस. डी. कुरणे)

---

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १/२०१८** — **निशाणी क्र. १८**

**सीएनआर क्र. एमएचपीयु–१८–००००२–२०१८**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती सुषमा किसन अनाके,<br>वयः ४१ वर्षे, धंदाः घरकाम, | ) | |
| २. | प्रतिक किसन अनाके,<br>वयः २० वर्षे, धंदाः शिक्षण, | ) | |
| ३. | प्राजक्ता किसन अनाके,<br>वयः २२ वर्षे, धंदाः शिक्षण, | ) | ... **अर्जदार** |
| ४. | प्रतिक्षा किसन अनाके,<br>वयः १८ वर्षे, धंदाः शिक्षण,<br>सर्व राहणार– भिमनगर, दौंड, ता. दौंड,<br>जि. पुणे. | ) | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| कोणीही नाही. | ) | ... **जाब देणार** |

---------------------------------

**अर्ज–** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज...

---------------------------------

## न्यायनिर्णय

(पारित दिनांक २६ जुन, २०१८)

प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता दाखल केला आहे.

अर्जदार क्र. १ ते ४ यांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः

०२. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील किसन शामराव अनाके यांचे दिनांक १३/०४/२०११ रोजी राजेगांव, ता. दौंड, जि. पुणे येथे निधन झाले आहे. मयत किसन शामराव अनाके हे राज्य परिवहन महामंडळामध्ये चालक म्हणुन नोकरीस होते, त्यांचा चालक क्र. २८३४९ आगार दौंड असा होता. अर्जदार क्र. १ यांनी राज्य परिवहन विभागीय कार्यालय, पुणे विभाग, शंकरशेड रोड, पुणे ४११०३७ यांचेकडे अर्जदार क्र. २ यास कै. किसन शामराव अनाके यांचे मृत्युपश्चात अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी दिनांक २९/०४/२०१२ रोजी अर्ज केला असता संबंधित खात्याने मयत किसन शामराव अनाके यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे प्रमाणपत्र हजर करणेबाबत कळविले आहे, त्यामुळे अर्जदारी यांना न्यायालयात सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. करिता अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत किसन शामराव अनाके यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेची विनंती केली आहे.

०३. अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहिर सुचना व जाहिर प्रकटन दैनिक 'प्रभात' या वृत्तपत्रात दिनांक १५/०३/२०१८ वर प्रकाशीत करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास कळविण्यास सांगितले, परंतु अद्याप न्यायालयात कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

०४. अर्जदारांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करिता उपस्थीत झाले, त्यांचेवरील निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. किसन शामराव अनाके यांचे कायदेशीर वारस असुन ते वारसाचा दाखल मिळणेस पात्र आहेत काय? | ... होकारार्थी |
| २ | काय आदेश? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिताः**

०५. अर्जदार क्र. १ सुषमा किसन अनाके आणि अर्जदार क्र. २ प्रतिक किसन अनाके यांनी त्यांचे स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र अनुक्रमे नि.१२ व नि.१३ वर दाखल केले असुन पुराव्याचे शपथपत्र म्हणजे मुळ अर्जाची पुनरावृत्तीच आहे, म्हणुन पुराव्यांचा ऊहापोह पुन्हा केलेला नाही. अर्जदारांनी त्यांच्या पुराव्या पुष्ठ्यर्थ कै. किसन शामराव अनाके यांचा मुळ मृत्यु दाखला नि.१५, अर्जदारांचे शिधापत्रिकेची प्रमाणित प्रत नि.१६ आणि दिनांक ११/०७/२०१७ रोजीचे राज्य परिवहन विभागीय कार्यालय, पुणे यांचे पत्र नि.१७.

०६. अर्जदारांतर्फे घेण्यात आलेला लेखी व तोंडी पुरावा एकमेकास पुरक असुन अबाधित आहे. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज व जाहिर प्रकटन नि.११ दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. मयत किसन शामराव अनाके यांचा दिनांक १३/०४/२०११ रोजी मृत्यु झालेला असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याचे निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. करिता मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करिताः**

०७. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. किसन शामराव अनाके यांचे कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट झाले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे कै. किसन शामराव अनाके यांचे कायदेशीर वारस असल्याने त्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरले आहेत. परिणामतः अर्जदारांचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. करिता मुद्दा क्र. २ चे उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेः

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. श्रीमती सुषमा किसन अनाके (अर्जदार क्र.१), प्रतिक किसन अनाके (अर्जदार क्र.२), प्राजक्ता किसन अनाके (अर्जदार क्र.३) आणि प्रतिक्षा किसन अनाके (अर्जदार क्र.४) हे कै.किसन शामराव अनाके यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्याकरिता अर्जदार क्र. १ ते ४ यांनी योग्य तो न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

सही/–

**( समीर डी. कुरणे )**

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, दौंड,

ता. दौंड, जि. पुणे.

दिनांकः २६/०६/२०१८.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ATNURE M. C. |
| Court | : | Shri.S.D.Kurane, JMFC, Daund. |
| Date | : | 26.06.2018. |
| Judgment signed by the presiding officer on | : | 26.06.2018. |
| Judgment uploaded on | : | 27.06.2018. |